MMNY's 50 1970-2020 ANNIVERSARY

महाराष्ट्र मंडळ न्यूयॉर्क

MAHARASHTRA MANDAL NEW YORK

# स्नेहदीप

एप्रिल २०२०



*Cover Picture : Dipti Kulkarni*




# स्नेहदीप

न्यू यॉर्क महाराष्ट्र मंडळाचे त्रैमासिक

वर्ष १०, अंक २ - एप्रिल, २०२०




## स्नेहदीप संपादक मंडळ

| | |
|---|---|
| **संपादक:** | नीता नाबर |
| **संपादक मंडळ:** | किनी प्रभाकर, डॉ. सोनिया शेट्ये |

**महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क कार्यकारिणी**

**अध्यक्ष:** किनी प्रभाकर

**उपाध्यक्ष:** जया बहाडकर

**कार्यवाह:** आशिष माटे

**कोषाध्यक्ष:** डॉ. सोनिया शेट्ये

**कार्यक्रम समन्वयक :** सुमित कोपर्डे

**'बृहन् महाराष्ट्र मंडळा'साठी 'महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क'ची प्रतिनिधी -** मानसी करंदीकर

**MMNY सुवर्णमहोत्सव**

**बोधचिन्ह - श्री. जयंत विठ्ठल कुळकर्णी**

**बोधवाक्य - सौ. वीणा जयंत कुळकर्णी**

**स्नेहदीप: जाहिरात दर**

| | |
|---|---|
| संपूर्ण पान: | $70.00 |
| अर्धे पान: | $40.00 |
| पाव पान: | $25.00 |
| अष्टमांश पान: | $15.00 |

**वार्षिक जाहिरातींस १० टक्के सवलत आहे.**

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| मुखपृष्ठ-दिप्ती कुलकर्णी, अनुक्रमणिका चित्र-जालावरून साभार | |
| अध्यक्षीय - किनी प्रभाकर | ३ |
| संपादकीय - नीता नाबर | ४ |
| महाराष्ट्र मंडळ न्यू यॉर्कची सुवर्ण पावले... भाग २ - जयंत कुळकर्णी | ६ |
| जयश्रीताई माने यांना देवाज्ञा | २२ |
| जयश्रीताई माने यांना श्रध्दांजली - जयंत कुळकर्णी | २३ |
| लेकीची आई - वैशाली पेणकर | २५ |
| संस्कृत सुभाषित | २६ |
| MMNY on Facebook - Kini Prabhakarr | २६ |
| सुरेश भटांच्या रचनेतील वेगळी , मनमोकळी आणि लाघवी स्त्री। - किरण डोंगरदिवे | २७ |
| कविता - किरण डोंगरदिवे, वैशाली पेणकर | ३४ |
| पाककृती - Corn Curry - प्रीती बाणावलीकर | ३५ |
| जानेवारी शब्दकोड्याचे उत्तर - विनायक दामले | ३६ |
| एप्रिल शब्दकोडे - नीता नाबर | ३७ |
| जानेवारी कोड्याचे उत्तर, एप्रिल कोडे | ३८ |
| जोडीदार (वधूवरसूचक सदर) | ४० |
| १ एप्रिल २०२० ते ३१ ऑगस्ट २०२० मधील काही महत्वाचे दिवस | ४१ |


**स्नेहदीप: संपादकीय धोरण**

- स्नेहदीप दर वर्षी जानेवारी, एप्रिल, जुलै व ऑक्टोबर/नोव्हेंबर महिन्यात प्रकाशित होईल.• स्नेहदीपसाठी कथा, कविता, प्रवासवर्णन, लेख व इतर साहित्याचे स्वागत आहे. साहित्य **info.mmny.online@gmail.com** या पत्त्यावर ई-मेलने पाठवावे. साहित्याचा मोबदला दिला जात नाही
- साहित्य मराठी किंवा इंग्रजीत असावे. मराठी टंकलिखित साहित्य कोणत्याही युनिकोड फॉटमधे असणे आवश्यक आहे. हस्तलिखित साहित्य स्कॅन करून पाठवावे. सर्व साहित्य ठराविक तारखेच्या आत पाठवावे.
- प्रकाशित साहित्यातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
- साहित्य प्रकाशित करण्याबाबतचा, तसेच साहित्यात किरकोळ दुरुस्त्या व कपात करण्याचा अधिकार संपादक मंडळाकडे आहे.
- साहित्याची निवड करताना न्यू यॉर्क महाराष्ट्र मंडळाच्या आजी व माजी सभासदांच्या साहित्याला प्राधान्य देण्यात येईल.
- स्नेहदीपमधील जाहिरातींतील उत्पादने व सेवांसाठी महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क कोणत्याही प्रकारे जबाबदार नसेल.

## अध्यक्षीय

नमस्कार,

१ मे १९७० साली आपल्या 'महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क' ची स्थापना झाली. या सुवर्ण वर्षाच्या तुम्हां सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

खरं तर कुणीतरी जादूची छडी फिरवावी आणि हे वर्ष अंतर्धान पावावे अशी आजची परिस्थिती आहे. कोरोना विषाणू या अदृश्य शत्रूबरोबर झुंजताना आपल्या सर्वांनाच अनेक आव्हानांना सामोरं जावं लागतंय.

त्यात आपल्या ज्येष्ठ विश्वस्त जयश्रीताई माने यांचं अचानक देहावसान झालं. ही मंडळाची कधीही न भरून निघणारी पोकळी आहे. जयश्रीताईंना भावपूर्ण श्रद्धांजली !

या दिवसांत आपले कुटुंबीय, आरोग्य, नोकरी, व्यवसाय, शिक्षण या सर्वांचा समन्वय साधताना आपला वारसा, संस्कृती यांचं जतन करणे आवश्यक आहे. पण आपण एकत्र येऊ शकलो नाही. जरी घरातून बाहेर पडता येत नसले तरी technology चा वापर करून आपण बरीच मंडळी एकत्र Telephone conference call वर आलो, एकमेकांची विचारपूस केली, गप्पा मारल्या. हयाला चांगला प्रतिसाद मिळाला. लवकरच व्हिडिओ मीटिंग दवारे एक, गाण्यांचा कार्यक्रम करण्याचा मानस आहे.

लवकरच ही परिस्थिती सुधारू दे आणि विश्वात शांती येऊ दे हा विश्वास आणि ईश्वराकडे प्रार्थना.

आपली काळजी घ्या.

**आपली विनम्र,**
**किनी प्रभाकर**
**अध्यक्षा (President) - 'महाराष्ट्र मंडळ, न्यूयॉर्क'**

## संपादकीय

नमस्कार मंडळी !

ह्या वर्षी कोरोना विषाणूने जगभरात सर्वांपुढेच आव्हाने उभी केली आहेत. कोरोनाच्या जोडीला MMNY साठी आणखीही काही दु:खद घटना घडल्या आहेत. डॉ. उषादेवी कोल्हटकर यांच्या पाठोपाठ, MMNY च्या विश्वस्त, रंगदीप २०१३च्या संपादिका, लेखिका, कवयित्री, डॉ. जयश्री माने यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने आकस्मिक निधन झाले, त्यामुळे MMNY, रंगदीप व स्नेहदीप परिवाराच्या शोकाकुल मन:स्थितीत भर पडली आहे. जयश्रीताईंना 'स्नेहदीप' तर्फे भावपूर्ण श्रध्दांजली !

सद्य परिस्थितीमुळे मित्रमंडळी, नातेवाईक, मराठी मंडळे छोटे-मोठे समारंभ करू शकत नाही आहेत, लोक एकमेकांकडे जाऊ-येऊ देखील शकत नाही आहेत. पण एक सकारात्मक विचार म्हणजे आपल्याकडे प्रगत तंत्रज्ञान उपलब्ध आहे. त्यामुळे लोक online कार्यक्रम करत आहेत, गप्पा मारत आहेत, अंताक्षरी व इतर खेळ खेळत आहेत. लोक internet वर चित्रपट, नाटकं, गाणी, कार्यक्रम पाहत आहेत आणि internet वर पुस्तकंही वाचत आहेत. आपला 'स्नेहदीप' देखील e-magazine असल्यामुळे सध्याच्या lockdown/quarantine च्या काळात घरच्या घरी internet वर वाचता येईल.

'स्नेहदीप'च्या या अंकात, MMNY च्या गेल्या ५० वर्षांचा इतिहास सांगणाऱ्या, जयंत विठ्ठल कुळकर्णी यांच्या लेखाचा दुसरा भाग आहे, व त्यांनीच डॉ. जयश्री माने यांना श्रध्दांजलीही वाहिली आहे. एप्रिल महिन्यात कवि सुरेश भट यांची जयंती असल्याने किरण डोंगरदिवे यांनी त्यांच्यावर लेख लिहिला आहे. तर मे महिन्यात 'मदर्स डे' असल्याने वैशाली पेणकर यांनी 'लेकीची आई' हा लेख लिहिला आहे. शिवाय किरण डोंगरदिवे, वैशाली पेणकर यांच्या कविता, प्रीती बाणावलीकर यांची पाककृती, शब्दकोडं, कोडं, सुभाषित, १ एप्रिल २०२० ते ३१ ऑगस्ट २०२० पर्यंतच्या काही महत्त्वाच्या तारखा, MMNYच्या Facebook pageविषयीची माहिती हे सर्वही तुम्हाला या अंकात मिळेल.

या अंकातील 'जोडीदार' या सदराचे नियम जरूर पहावे व नवीन विवाहबंधने जुळवून आणण्यासाठी या सदराचा उपयोगही करावा. आपल्याला आत्तापर्यंतच्या 'स्नेहदीप'च्या अंकांबद्दल काही कळवायचे असल्यास info.mmny.online@gmail.com या ई-मेल पत्त्यावर जरूर कळवावे. आम्ही ते 'वाचकांच्या प्रतिक्रिया' या सदरात छापू. मात्र प्रतिक्रिया थेट वाचकाकडूनच आली पाहिजे व ती स्नेहदीपमध्ये छापण्याची स्पष्ट सूचना केलेली असावी.

'स्नेहदीप'चा हा अंक वाचकांना आवडेल अशी आशा; आणि MMNY समितीचे, व स्नेहदीप साकारण्यात सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मन:पूर्वक आभार !

लवकरात लवकर कोरोनावरील लस, उपचार यांचा शोध लागावा व/वा सामुदायिक रोगप्रतिकारशक्ती उत्पन्न व्हावी आणि सर्वांचे जीवन पूर्ववत, सुरळीत व्हावे ही प्रार्थना !

काळजी घ्या व सुरक्षित रहा !

**- नीता नाबर**



महाराष्ट्र मंडळ न्यू यॉर्क
MAHARASHTRA MANDAL NEW YORK
MMNY.ONLINE ESTD.1970



# Celebrating Golden Jubilee Year 2020

MMNY's
50
1970-2020
ANNIVERSARY
सुवर्ण पावले मंडळाची,
करू दे वाटचाल शतकाची
१९७०-२०२०

**MMNY Executive Committee:**

- Kini Prabhakar (President)
- Jaya Bahadkar (Vice President)
- Ashish Mate (Secretary)
- Dr. Sonia Shetye (Treasurer)
- Sumit Koparde (Program Coordinator)

•

- Dilip Shetye (Trustee)
- Manasi Karandikar (Trustee)

# महाराष्ट्र मंडळ न्यू यॉर्कची सुवर्ण पावले... भाग २

नमस्कार,

आपल्या मंडळाच्या सुवर्ण पावलांमधील 'मंडळाची नाट्य परंपरा' हा दुसरा महत्वाचा भाग लिहितांना मला आनंद होतोय. कारण, जगाच्या पाठीवर आपण कुठेही जा - मूळातच मराठी माणूस हा नाट्यप्रेमी आहे. ‘नाटकाचा इतिहास हा सांस्कृतिक इतिहास आहे’ तो जतन करणारा मराठी माणूस हा मुळातच नाट्यप्रेमी-नाटकवेडा आहे. त्यामुळे आंगिक कलांचा व्यक्तिशः किंवा समुदायाने आविष्कार करण्याचे स्थान असणाऱ्या न्यू यॉर्क मंडळाच्या रंगभूमीवर आपल्या मंडळाची नाट्य परंपरा व त्याचं सादरीकरण निश्चितच दर्जेदार होतं. मंडळाच्या बॅनरखाली अत्यंत मेहनत घेऊन उत्साहाने दरवर्षी दोन नाहींतर निदान एक तरी नाटक मंडळात ३००-४०० रसिकांसमोर नियमित सादर केलं जात होतं. यात अभिनयमय, संगीत-गायन, नृत्यमय किंवा काव्यात्मक कलाकृती होती. त्याचप्रमाणे नाटकामधील शब्दसंहिता, कथानक, त्यात आलेल्या विषयांचा तपशील, संवाद, पदे, वाद्यसंगीत, पार्श्वसंगीत, नृत्ये, वग, संघर्ष, उत्कंठा, नेपथ्य, वेश-रंगभूषा, प्रकाशयोजना, अभिनय आणि उत्तम कथानक होतं. थोडक्यात यात संगीत, कौटुंबिक, सामाजिक, वगनाट्य, विनोदी, फार्स, इत्यादी सर्व कांही होतं. मंडळाच्या कार्यकारिणीमध्ये असणाऱ्यांपासून सभासदांसह, व्यावसायिक, लोकल आणि देश-विदेशी कलाकारांचा त्यात प्रामुख्याने समावेश होता. असो. सोबत दिलेल्या चित्रमय इतिहासावरून

विस्मृतीत गेलेल्या आपल्या आठवणींना उजाळा देण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. मंडळाचा सचित्र इतिहास लिहायला गेल्या दोन वर्षात मला अनेकांनी मदत केली. आणि जे कांही दुर्मिळ धन मिळलं अथवा मिळवलं ते तुमच्या समोर ठेवत आहे. ज्यांनी ते मुक्तहस्ते दिलं त्यांचा मी अत्यंत आभारी आहे. त्यांची नांवे पुढीलप्रमाणे आहेत: कै. दिलीप व शोभा चित्रे, नीला व राम इनामदार, सुवर्णा आनंद जोशी, मीना राजे, सुषमा व प्रकाश येरवडेकर, शोभा व आनंद आकेरकर, सविता गोखले, प्रकाश रणदिवे, डॉ. देवदत्त बेंद्रे, विवेक बेंद्रे, शैला सुनील नाईक, आरती हर्डीकर, सुधीर व शरद शिराली, सुहास व अलका पै आणि हरिभाऊ व उषाताई आठवले. नजरचुकीने कांही नांवे राहिली असतील तर क्षमस्व. धन्यवाद.

करोनाव्हायरसमुळे साऱ्या विश्वाला त्याचे परिणाम भोगावे लागत आहेत. आपलं मंडळ त्याला अपवाद नाही. अशा कठीण परिस्थितीत आपल्या मंडळानेही योग्य पावलं उचलली आहते. यामुळे ‘सुवर्ण महोत्सव’ जरी लांबला असला तरी, सभासदांचा असलेला पाठिंबा, सहकार्य व जाणीवपूर्वक मदतीमुळे उत्साह कायम आहे व असणार. नाईलाजाने त्याला थोडीशी दिरंगाई असेल… असो.

आपला,

**जयंत विठ्ठल कुळकर्णी.**

jvkny1@gmail.com

---

## आपल्या मंडळाची नाट्य परंपरा:



मंडळाचे सभासद व कलाकार अशोक सबनीस यांनी लिहिलं आहे की, १९७१मध्ये मुंबईच्या एअर इंडियाच्या कलाविभागाने केलेलं ‘तुझे आहे तुझपाशी’ या नाटकाचा सर्व प्रथम प्रयोग आपल्या मंडाळात सादर केला होता. नंतर आपल्या मंडळातर्फे मंडळाच्या कलाकारांनी १९७२मध्ये, शरद कवडी यांनी 'कवडी चुंबक' हे नाटक सादर केलं. पुढे कावडी यांनी तीन वर्षानी 'संध्याछाया' नाटक सादर केलं होतं. नंतर न्यू यॉर्क महाराष्ट्र मंडळाने दरवर्षी किमान एक नाहींतर दोन तरी नाटकं आजतागायत यशस्वीपणे सादर केली आहेत. त्यात प्रामुख्याने गडकरी दर्शन, भटाला दिली ओसरी व सूर्याची पिल्ले यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. असो.





*नीला इनामदारच्या सौजन्याने.* ***१) नाटक: ‘भटाला दिली ओसरी’ १९७५. कलाकार: सुवर्णा जोशी, अमिता टेंबे, मुकंद जोगळेकर, नीला इनामदार व अशोक कशेळकर... २) नाटक: 'सूर्याची पिल्ले'. आनंद व सुवर्णा जोशी आणि अशोक कशेळकर...३) नाटक: 'किनारा' १९९६. नीलाताई नार्वेकर, विवेक बेंद्रे, वंदना मुळगुंद व सचिन नार्वेकर...***





*नीला इनामदारच्या सौजन्याने.* ***१) नाटक: 'सूर्याची पिल्ले'. राम इनामदार, चंद्रकांत मेहता, सुवर्णा जोशी, निला इनामदार, आनंद जोशी, शरद सातपुते व अशोक कशेळकर... २) नाटक: 'सूर्याची पिल्ले'. अशोक कशेळकर, शरद सातपुते व नीला इनामदार... ३) सुहास व अलका पै निर्मित व दिग्दर्शित, न्यू जर्सी कलाकारांचं आपल्या मंडळात झालेलं अत्यंत विनोदी फार्सिकल नाटक 'ईष्काचा सरदार'...*** *सुहास पै यांच्या सौजन्याने...*




*नीला इनामदारच्या सौजन्याने.* ***१) नाटक: 'मन सज्जना'. डावीकडून: रेखा काबाडी, मोहन मुणगेकर, नीला इनामदार व शोभा कशेळकर... २) नाटक: 'किनारा' १९९६. डावीकडून: वंदना मुळगुंद, डॉ. विनायक गोखले, नीला इनामदार व विवेक बेंद्रे...***





***१) आपल्या मंडळात शिकागो मंडळानी केलेल्या 'सौजन्याची ऐशी तैशी' या धमाल-विनोदी नाटकाची दिग्दर्शक, कलाकार व प्रसिद्ध अभिनेत्री 'अनुपमा' कुलकर्णी-धारकर... २) नाटक:***

***'सौजन्याची ऐशी तैशी'... नीला इनामदारच्या सौजन्याने. ३) नाटक: 'किनारा' १९९६. डावीकडून: नीला इनामदार व नीलाताई नार्वेकर...*** *नीला इनामदारच्या सौजन्याने.*



*नीला इनामदारच्या सौजन्याने.* ***१) दरवर्षी South Street Seaport वर FIA तर्फे होणाऱ्या दिवाळीच्या कार्यक्रमात आपल्या मंडळाच्या कलाकारांनी कोळी व इतर नृत्यात अनेकदा प्रथम पारितोषीकं-ट्रॉफीज मिळविली होती. त्यातील यशस्वी कलाकार. डावीकडून: कांचन दादरकर, वैशाली मोहिले, ईला मेहता, शोभा कशेळकर, नीला इनामदार व रश्मी झापर्डे... २) मंडळात सादर झालेलं मयूर नृत्य... ३) मंडळात सादर झालेलं पारंपारिक नृत्य...***

---

## संगीत साष्टांग नमस्कार:

आपल्या मंडळाने १९८३ मध्ये 'संगीत साष्टांग नमस्कार' हे आचार्य अत्रेकृत तुफान विनोदी तीन अंकी नाटक दिवाळीत सादर केले होते. याची आपल्याला निश्चित आठवण असेल. त्या यशस्वी नाटकात मंडळाच्या अनेक कलाकारांनी मेहनत घेऊन भाग घेतला होता. मी मंडळाचा सचित्र इतिहास लिहीत आहे याची जाणीव ठेऊन त्याची दुर्मिळ छायाचित्रें व माहितीपत्र मंडळाच्या आजीव सभासद सुषमा व प्रकाश येरवडेकर यांनी पाठविली. त्याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.




*वरील आकर्षक माहितीपत्र सुषमा व प्रकाश येरवडेकर यांच्या सौजन्याने...*





***नाटक: 'संगीत साष्टांग नमस्कार' १९८३. कलाकार, डावीकडून: मृदुला दीक्षित, सुवर्णा आनंद जोशी, सचिन नार्वेकर, हेमांगी आनंद जोशी, प्रकाश येरवडेकर, सुधीर तिवारी व धनंजय केळकर.*** *नीला इनामदार यांच्या सौजन्याने...* ***२) आनंद व सुवर्णा जोशी.*** *सुवर्णा जोशी यांच्या सौजन्याने...* ***३) 'संगीत साष्टांग नमस्कार' या नाटकातील कलाकार.*** *सुवर्णा जोशी यांच्या सौजन्याने...*

---

## आनंदी गोपाळ नाटक:

श्री. ज. जोशी यांच्या 'आनंदी गोपाळ' या कादंबरीवर आधारित 'आनंदी गोपाळ' हे नाटक मी बऱ्याच वर्षांपूर्वी मुंबईत दादरच्या शिवाजी मंदिरमध्ये पाहिलं होतं. आणि ते स्मरणात राहिलं, डॉ.

काशिनाथ घाणेकर यांच्या गोपाळच्या प्रभावी भूमिकेमुळे. आणि सुहास जोशी यांनी केलेल्या आनंदीच्या प्रभावी भूमिकेमुळे. अर्थात, इतर कलाकारांसह नाटकाचा गाभाही सर्वांगसुंदर होता. त्यानंतर त्याच तोडीचं ते दर्जेदार व संस्मरणीय ‘आनंदी गोपाळ’ नाटक पुनः पाहण्याचा योग्य अनेक वर्ष्यांनी आला तो १९९३ साली आपल्या मंडाळात. हे नाटक कायमचं स्मरणात राहिलं ते, सादर करणाऱ्या हरिभाऊ आठवले यांच्या उत्कृष्ट दिग्दर्शनामुळे व अंजली आगाशे यांच्या आनंदीबाईंच्या अप्रतिम भूमिकेमुळे. तसेच, या नाटकात मंडळाचे इतर अनेक हौशी व जबरदस्त कलाकारही होते. त्यांनीही भूमिका चोख बजावल्या होत्या. थोडक्यात, व्यवसायिक रंगभूमीवरील एक सर्वांगसुंदर नाटक पाहिल्याचा आनंद या ‘आनंदी गोपाळ’ नाटकाने रसिकांना दिला होता. त्याचे श्रेय सर्वानाच जाते. यात शंका नाही. आपल्या मंडळाची ती वैभवी ‘नाट्य परंपरा' सर्वश्रुतच होती. मंडळात झालेले सर्व नाट्य प्रयोग ‘हाऊस फुल्ल’ जात होते. तसेच, इतर कार्यक्रमालाही रसिक प्रेक्षक तेव्हडीच दाद देत असत. दुर्दैवाने आज मंडळाची ती नाट्य-परंपरा बंद पडली आहे. कदाचित, चमत्कार घडून ती प्रथा यापुढे चालू राहिल अशी अपेक्षा करतो. निदान मंडळाच्या या सुवर्ण महोत्सवी वर्षामित्ताने असो.

मंडळी, हरिभाऊंकडे मी मदत मागीतली आणि "आंधळा मागतो एक डोळा, अन देव देतो दोन डोळे" अशी माझी परिस्थिती झाली. त्याचं असं झालं, नाट्य-परंपरेवर मंडळाचा इतिहास लिहितांना, ‘आनंदी गोपाळ’ या नाटकावर लिहून नाट्य-परंपरेवर शेवट करावा असे मी ठरविले होते. मला खात्री होती की, माझ्या या प्रकल्पाला हरिभाऊ मला पूर्णपणे सहकार्य करतील. आणि तसंच झालं… त्याची ही नाट्य-कहाणी, हरिभाऊंच्याच शब्दात…

**दिग्दर्शक म्हणून हरिभाऊ यांच्या नोंदी:**

"आनंदी गोपाळ" हे नाटक आपल्या मंडळात करावे ही कल्पना प्रथम माझ्या पत्नीने-उषाने सुचविली होती. बहुदा १९९२ मधील 'एकता' या मासिकात अंजली कीर्तनेचा 'आनंदी गोपाळ' वर

लेख लिहिला होता. श्री. ज. जोशी यांनी त्या विषयावर खूप वर्षांपूर्वी कादंबरी लिहिली होती. अंजली कीर्तने यांनी न्यू यॉर्कच्या पुकेप्सी येथील आनंदीच्या समाधीचा शोध कसा घेतला याचे वर्णन त्या लेखात होते. तो लेख वाचल्यावर उषाच्या मनात 'आनंदी गोपाळ' नाटकाचा विचार रुजला. नुसताच रुजला नाही तर, त्याचा सातत्याने पाठपुरावा केला. आम्ही १२ वर्षाच्या न्यू यॉर्कमधील वास्तव्यानंतर १९९४ मध्ये भारतात परतणार होतो. मी स्वतः न्यू यॉर्क महाराष्ट्र मंडळात १९८६ ते १९९४ पर्यंत कार्यरत होतो. शिवाय, मी 'कालचक्र', 'डॉक्टर तुम्ही सुद्धा' आदी मंडळाच्या नाटकातून भूमिका केल्या होत्या. 'पुढारी पाहिजे' ही एकांकिका संपूर्ण नवीन मंडळींना घेऊन मी दिग्दर्शित केली होती व त्यात कामही केले होते. उषाने प्रस्ताव मांडला की, आपण आता परत जाणार आहोत तर मंडळासाठी 'आनंदी गोपाळ' हे कठीण नाटक सादर करून एक आगळी वेगळी भेट येथील रसिकांना देऊया. या प्रस्तावाने माझ्यातही संचार झाला आणि या नाटकाची ग्वाही आम्ही मंडळात दिली.

२) नाटकाचा काळ, त्या वेळची वेशभूषा, भाषेची लकब वगैरे सर्व पाहतां आपण उगीचच या नाटकाची जबाबदारी घेतली असे वाटू लागले. स्वतःलाच उभारी येण्यासाठी आम्ही कांहीजण मुद्दाम पुकेप्सीला गेलो व आनंदीच्या समाधीचे दर्शन घेऊन तेथे तिच्या जीवनावरील नाटक सादर करण्याची शपथ घेतली.

३) भारतात या नाटकाचे १०० प्रयोग झालेले होते. त्यात प्रमुख भूमिका काशिनाथ घाणेकर (गोपाळ) व सुहास जोशी (आनंदी) यांनी केल्या होत्या. त्या नाटकात जवळजवळ १७-१८ पात्रे होती. आम्ही त्याचा फायदा घेऊन जास्तीत जास्त नवीन चेहरे सादर केले.

४) १९९२ डिसेंबरमध्ये माझी मुलगी प्रतिमा भारतात जाणार होती. नाटकासाठी लागणारी बरीचशी ड्रेपरी (आलवणा सकट) तिकडून घेऊन आली होती. तसेच, ठाण्याला मुद्दाम जाऊन प्रतिमाने सुहास जोशींची भेट घेतली व त्यांनी स्वानुभवातून कांही मौल्यवान सूचना केल्या होत्या. त्याही प्रतिमा सोबत घेऊन आली होती. आम्ही 'आनंदी गोपाळ' नाटक करण्याचा विडा उचलला आहे या बातमीने आमची भारतातील मित्रमंडळी भारावून गेली होती. उषाच्या मैत्रिणीने प्रतिमाला मुद्दाम सुलोचनादीदींकडे नेले होते व प्रतिमाने सुलोचनादीदींचे आशीर्वाद बरोबर

आणले होते. सर्वांनाच हे नाटक अमेरिकेत होत आहे याचे अप्रूप वाटत होते.

५) या नाटकातील सीन्स ठिकठिकाणी घडतात. म्हणजे, पुण्यातील दोन घरे. एक आनंदीबाईंच्या माहेरचे व सासरचे, कलकत्ता येथील घर, अमेरिकेतील कार्पेंटर कुटुंबाचे घर वगैरे. मंडळाला असे विविध रंगमंच उभे करणे अशक्य नव्हते. म्हणून आम्ही या नाटकात मोजक्याच वस्तू कलात्मकरित्या वापरून तसा आभास निर्माण केला होता. रंगमंचावर एक खिडकी होती. त्याच्या बाहेर दिसणारे दृश्य बदलून जागा बदलण्याची जाणीव करून देत होतो. अमेरिकन घर दाखविण्यासाठी फक्त 'फायर प्लेस' सुचकतेने दाखविली होती. हे करण्यासाठी मंडळातील उत्साही कार्यकर्त्यांचे संपूर्ण सहकार्य मिळालं होते. आश्चर्य म्हणजे, यातील कुठल्याही कलाकारांनी मूळ 'आनंदी गोपाळ' हे नाटक पाहिलेलं नव्हतं. त्यामुळे त्यांचा उत्तम अभिनय ही नक्कल नव्हती हे विशेष होतं.

सरते शेवटी हे नाटक न्यू यॉर्कच्या मंडळात सादर झाले. नंतर न्यू जर्सीत मराठी विश्व व टोरोंटो येथील मंडळातही कार्यक्रम झाले. असे एकूण तीन यशस्वी प्रयोग झाले. सर्वत्र रसिक प्रेक्षकांनी या नाटकाचं उत्फुर्तपणे स्वागत केलं होतं व उत्तम दादही दिली होती. रंगमंचावरील पुढील व मागील सर्व कलाकारांच्या उत्साहामुळे आणि सहकार्यामुळे एक आगळी-वेगळी ऐतिहासिक संस्मरणीय कलाकृती सादर केल्याचा आनंद व पूर्ण समाधान मिळाले.

**हरिभाऊ आठवले.**



***१) लेखक श्री. ज. जोशी यांचे 'आनंदी गोपाळ' पुस्तक... २) कांही वर्ष्यांपूर्वी हरिभाऊ व उषाताई आठवले यांनी आमच्या घरी भेट दिली तेव्हा... ३) हरिभाऊ, उषाताई व मी...***



*देवगंधर्व भास्करबुवा बखले यांची नातसून व आमच्या स्नेही सुप्रसिद्ध पंडिता शैला दातार यांच्यामुळे एका इतिहासाचे आम्ही साक्षीदार बनलो ते स्थळ... १) आनंदीबाई यांचा जेथे जन्म व मृत्यू झाला तो पुण्यामधील सुप्रसिद्ध गायनाचार्य-देवगंधर्व भास्करबुवा बखले यांचं ऐतिहासिक घर व व त्यांचा सव्वाशे वर्षांपूर्वीचा भारत गायन समाज...*




*१) डॉ. आनंदीबाई जोशी... २) हरिभाऊंचं 'आनंदी गोपाळ' नाटक पाहिल्यानंतर आम्ही वीणाच्या आईबरोबर मुद्दाम पुकेप्सी येथे आनंदीबाईंचं स्मारक पाहायला गेलो होतो. Poughkeepsie, New York येथील Carpenter कुटुंबानी बांधलेले डॉ. आनंदीबाई जोशी यांचे स्मारक... ३) वीणा व तिची आई, त्या ऐतिहासिक स्मारकापाशी...*

*खाली: १-२-३) हरिभाऊ आठवले यांच्या ऐतिहासिक 'आनंदी गोपाळ' नाटकाची मी केलेली आकषर्क माहितीवजा पत्रकं...*




*खालील सर्व फोटो हरिभाऊ व उषाताई आठवले यांच्या सौजन्याने...*





***१) छोट्या आनंदीच्या भूमिकेत, मुग्धा सावकार... २) मोठ्या आनंदीच्या भूमिकेत अंजली आगाशे व गोपाळच्या भूमिकेत डॉ. विनायक गोखले... ३) अंजली आगाशे व डॉ. विनायक गोखले...***




***१-२) आजीच्या भूमिकेत नीलाताई नार्वेकर व अंजली आगाशे...***




१) डॉ. विनायक गोखले व अंजली आगाशे... २) गणपतरावांच्या भूमिकेत डॉ. धनंजय केळकर, यमूच्या आईच्या भूमिकेत सुरेखा गुप्ते, यमूच्या भूमिकेत मुग्धा सावकार व डॉ. विनायक गोखले...





१) अंजली आगाशे व डॉ. विनायक गोखले... २) डॉ. विनायक गोखले, अंजली आगाशे व दांडेकरांच्या भूमिकेत हरिभाऊ आठवले... ३) दांडेकरांच्या भूमिकेत हरिभाऊ आठवले...





१) अंजली आगाशे व डॉ. विनायक गोखले... २) सौ. कार्पेंटरच्या भूमिकेत चित्रा व श्री. कार्पेंटरच्या भूमिकेत किरण जोगळेकर... ३) फादरच्या भूमिकेत प्रसन्न आठवले व डॉ. विनायक गोखले...




***१) अंजली आगाशे... २) 'आनंदी गोपाळ' या नाटकातील व पडद्यामागील यशस्वी कलाकार...***

---

**आपल्या मंडळाचा स्वातंत्र्यदिन - India Day Parade..!**

भारताला १५ ऑगस्ट १९४७ला जेव्हा स्वातंत्र्य मिळालं त्या मध्यरात्री १२ वाजतां मुंबई आकाशवाणीवरून लता मंगेशकरांनी *'युगकी संध्या, पृथक वधूसम. किसका पंथ, निहार रहें.'* हे समर-अमर गीत गायलं होतं. आज त्याला जवळ-जवळ सत्तरहून अधिक वर्ष होऊन गेली आहते. लताबाईंचं ते दुर्मिळ गीत आज कुणाच्या स्मरणात असेल..?
आपल्या शरद उर्फ बापू नार्वेकरांमुळे संयुक्तपणे साजरा होणारा महाराष्ट्र मंडळ न्यू यॉर्क व मराठी विश्‍व न्यू जर्सी तर्फे मॅनहॅटनमधील 'इंडिया डे परेड' हा कार्यक्रम आपल्या आठवणीत असेलच. मंडळाची ती सांस्कृतिक परंपरा अनेक वर्ष यशस्वीपणे चालली होती. तसेच, *'फेडरेशन ऑफ इंडियन असोसिएशन'* या संस्थेमुळे दोन्ही मंडळाचा मिळून एकत्र फ्लोट असे. अभिमानाची बाब म्हणजे, शरद नार्वेकर व नंतर सुभाष केळुस्कर हे *'फेडरेशन ऑफ इंडियन असोसिएशन'* संस्थेचे एकमेव मराठी सभासद व कार्यकर्ते होते. महाराष्ट्रातील नामवंत देश-पुढारी, सण, खेळ व निरनिराळे विषय घेऊन दरवर्षी ते फ्लोट कल्पकपणे सजविले जात होते. त्याचं दर्शन त्यात व मिरवणुकीत घडविलं जात असे. आणि तो फ्लोट या परेडचं एक प्रमुख आकर्षण असे. परेडच्या

आदल्या दिवशी न्यू जर्सी येथे डिझाईन केलेले ते फ्लोट कसे-काय होताहेत हे मंडळाच्या अध्यक्षांबरोबर मीही न्यू जर्सी येथे पाहायलाही जात असे. Uptown Madison Avenue वरून निघालेली ती ‘इंडिया डे परेड’ अखेरीस खाली 27 Street वर संपत असे. अध्यक्ष या नात्याने आपल्या मंडळाचे शरद नार्वेकर, नीला इनामदार, आनंद जोशी, सुरेश देशमुख, सुभाष केळुस्कर, सुनील नाईक वगैरेंशिवाय, न्यू जर्सीच्या शैला विद्वांस, मीना देवधर, चित्रा लेले, डॉ. प्रकाश लोथे, नंदा पडते इत्यादींचा इतर अनेक सभासदांसह उत्साहाने व आनंदाने त्या परेडमध्ये सहभाग असे. बहुसंख्य वेळी या परेडच्या मिरवणुकीत अतिशय परिश्रमपूर्वक नीला इनामदार तिच्या लहान-मोठ्या सभासद-कलाकार मंडळींबरोबर लेझीम, ढोल-ताशा व इतर प्रेक्षणीय सांस्कृतिक-पारंपारिक कला-नृत्य सादर करीत असे. महाराष्ट्र आणि भारताच्या इतिहासाचं व सांस्कृतिक दर्शन त्यात असे. त्यात न्यू जर्सी मंडळाचे अध्यक्ष, सभासद व कलाकारही भाग घेत असत. सुप्रसिद्ध सिनेनट-नट्या व नामवंत व्यक्ती या परेडमध्ये ग्रँड मार्शल असत. तेही परेडचे एक आकर्षण असे. ही सांस्कृतिक परेड पाहण्यासाठी व निरनिराळ्या भारतीय चविष्ट खाद्य पदार्थांचे भरपूर स्टॉल्स तेथे असल्याने ते पदार्थ खाण्यासाठी तेथे हजारोंनी सर्व जातीय प्रेक्षक असत. एकदा तर मी, सुहास तवकर व सुनील दीक्षित या तिघांनी मिळून ‘TDK’ नांवाखाली चक्क बटाटा वड्याचा स्टॉलही तेथे टाकला होता. ते सर्व वडे फस्त व्हायला वेळ लागला नव्हता. हा भाग वेगळा…




***१) डावीकडून: अनिल दादरकर, सुभाष व स्वाती केळुस्कर, नीला इनामदार व कांचन दादरकर.***

***नीला इनामदारच्या सौजन्याने... २) सुप्रसिद्ध नट ग्रँड मार्शल राजेश खन्ना... ३) डावीकडून दुसरे सुभाष केळुस्कर व बापू नार्वेकर...*** *नीला इनामदारच्या सौजन्याने...*



***१-३) मंडळाचे आकर्षक फ्लोट्स... २) डावीकडे बॅनर धरलेले डॉ. रवींद्र राजे व स्वाती केळुस्कर...*** *नीला इनामदारच्या सौजन्याने...*



***१) परेडच्या कल्पक थीम मधील संकल्पना नीला इनामदार: गोपालकृष्ण गोखले, वीर सावरकर व झांशीची राणी... २) नीला इनामदार. महात्मा गांधी... ३) नेहरू, लोकमान्य टिळक व इंदिरा गांधी...*** *नीला इनामदारच्या सौजन्याने...*



***१) दही हंडी... २) रामायणातील प्रसिद्ध व्यक्ती. पुढे डावीकडे चित्रा लेले... ३) लावणी नृत्य***

***करणारे मंडळाचे कलाकार. डावीकडून: गीता परब, ईला मेहता, नीलाताई नार्वेकर, रश्मी झापर्डे, वैशाली मोहिले. मागे शिवाजी झालेला अनिल दादरकर व जिजाई कांचन दादरकर.*** *नीला इनामदारच्या सौजन्याने...*



***१) सुरेश उर्फ अण्णा देशमुख, मी व पाणी पितांना वीणा... २) उन्हात दमून थकून परेड संपल्यावर विश्रांती घेतांना. डावीकडून: वीणा कुळकर्णी, स्वाती केळुस्कर, रमेश चौधरी, नीला इनामदार, शोभा भिडे, लता चौधरी, नीलाताई व बापू नार्वेकर आणि सत्कलमी...***




***१-२-३) २०१६ साली परेडमध्ये मंडळाने सादर केलेले प्रेक्षणीय ढोल-तमाशा व लावणी नृत्य...***

**जयंत विठ्ठल कुळकर्णी.**
Jvkny1@gmail.com

(क्रमशः)

# विश्वस्त जयश्रीताई माने यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



विश्वस्थ जयश्रीताई माने यांना देवाज्ञा !

नमस्कार,

अत्यंत व्यथित अंतःकरणाने आपल्या सर्वांना कळविण्यात येत आहे की, 'महाराष्ट्र मंडळ, न्यूयॉर्क' च्या विश्वस्थ,आजीव सभासद, 'रंगदीप' दिवाळी अंकाच्या माजी संपादिका आणि आमच्या सर्वांच्या लाडक्या, प्रेमळ, हसतमुख, नेहमीच मदतीसाठी तत्पर आणि अत्यंत बुद्धिमान जयश्रीताई माने यांचं रविवारी झोपेत हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं. ही मंडळाची अपरिमित हानी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो ही प्रार्थना. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. जयश्रीताईंच्या आठवणी आणि मार्गदर्शन हे आम्हाला नेहमीच प्रेरणादायी असेल.

भावपूर्ण श्रद्धांजली.

'महाराष्ट्र मंडळ, न्यूयॉर्क' समिती

http://antaraal.com/e107_v0617/content.php?content.109

**मंडळाचे ज्येष्ठ सभासद श्री जयंत कुळकर्णी यांनी जयश्रीताईंच्या थोर व्यक्तिमत्वावर लिहिलेला गौरवपूर्ण परिच्छेद जरूर वाचा.**




**निशिकांत, डॉ. जयश्री माने यांच्यासोबत मी...**

नमस्कार,

परवा डॉ. जयश्री माने यांना अचानक हृदयविकाराचा झटका येऊन गेल्याची धक्कादायक व दुःखद बातमी समजली आणि त्यावर आमचा विश्वासच बसेना. मन बधिर व सुन्न झालं. प्रामुख्याने माझ्या हितचिंतकापैकी त्या एक होत्या. माझ्या प्रत्येक लेखाचं-पत्रांचं त्वरित सविस्तर उत्तर पाठवून त्या तोंडभरून कौतुक करीत असत. तसंच, कांही मुद्दे पटले नाहीत तर मोकळेपणाने पण सौम्य भाषेत लिहीत व सांगत. हा त्यांचा साक्षेप, तत्परता, मनाचा मोठेपणा व विनयशील स्वभाव वाखाणण्यासारखा होता. जयश्रीताईं व निशिकांत यांचं सामाजिक कार्य फार थोर होतं. न्यू यॉर्कच्या महाराष्ट्र मंडळात व बृहन्महाराष्ट्र मंडळात त्यांनी मानाने कार्य

केलं होतं. मराठी व इंग्रजी भाषेवरील त्यांचं प्रभुत्व दर्जेदार होतं. रंगदीप या दिवाळी अंकासाठी लेखक, कवी, संपादक व परीक्षक या नात्यानं त्यांनी उल्लेखनीय काम केलं होत. तसेच, महाराष्ट्र मंडळ न्यू यॉर्कच्या त्या विश्वस्थ होत्या. या वर्षी मंडळाच्या होणाऱ्या सुवर्णमहोत्सवाच्या स्मरणिकेसाठी त्यांनी मला आठवणींवजा एक लेख लिहून पाठविणायचं वचन दिलं होतं. मात्र, ते अपुरं राहिलं याची खंत मनाला लागून राहिली... असो. सदैव हंसरं व्यक्तिमत्व असलेल्या जयश्रीताईंच्या आठवणी आमच्या कायमच्या स्मरणात राहतील यात शंका नाही. जयश्रीताईंच्या आत्म्यास मनःशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना..!

आपले,
जयंत व वीणा.
जयंत विठ्ठल कुळकर्णी.
Jvkny1@gmail.com

Sharing is Caring…

ता. क. मी नुकत्याच लिहिलेल्या 'टेनिस मधील ग्रँड स्लॅम बॉस, बॉब महादेवकर' हा लेख वाचून लेख त्यांनी जी प्रतिक्रिया व्यक्त केली होती ती वाचनीय होती. ती अशी:

"जयंत, लेखाला छान समाप्ती दिलीत. प्रसिध्दी परांड्मुख व्यक्तींची जगाला ओळख व्हायला वेळ लागतो जसे की फूल लपविले तरी त्याचा सुगंध कधीच लपत नाही. लेख सुंदर जमला आहे आणि त्यामागचे तुमचे प्रयास पूर्णपणे सार्थकी लागले आहेत. तसेच, ह्या लेखावरून अभिमानाने आठवण झाली की आमच्या मातोश्री तर, कै. ताराबाई काळे (लग्नापुर्वीचे नांव) या पुणे युनिव्हर्सिटीतर्फे खेळतांना टेनिस टुर्नामेंट्समध्ये सिंगल आणि डबल्सच्या विजेत्या होत्या."
वीणांना नमस्कार सांगा.
जयश्री माने.

# लेकीची आई

आई होणं ही स्त्रीजन्मासाठी परिपूर्णता असतेच. पण त्यातूनही एका 'लेकीची आई ' होणं हे स्त्रीला अधिक समृद्ध करतं... एका मातेचा हा ' स्व ' शोध....

खेडेगावातच नव्हे, तर आपल्या आजूबाजूला वावरणाऱ्या ई-जनरशेनमध्येही लेकीचं मातृत्व किती सहजपणे नाकारलं जातं, हे पाहून वाईट वाटतं ते त्या होऊ घातलेल्या 'लेकीच्या आई'साठी! लेकीचं आईपण म्हणजे.... लेकीच्या जन्मापासून त्या नात्यातला तो प्रत्येक क्षण, आईपणाचा तो प्रवास, ज्यात लेकच नव्हे; तर तिची आईही मोठी होत असते. लेक लहान असते तेव्हा, वेगवेगळ्या रंगीबेरंगी पिना, हेअरबँड, क्लिप्स, फ्रॉक्स, जीन्स, टॉप्स, स्कर्टस, इअरिंग्ज इतकंच काय, बाहुल्या, भातुकली अशा किती किती गोष्टीत जणू आपणच आपली राहिलेली हौस-मौज पुरवतोय की काय, असं आईला वाटत असतं. कुठल्याही कार्यक्रमासाठी लेकीला तयार करताना इतकं मग्न व्हायला होतं की, आपलीही तयारी करायची आहे हे लक्षातच येत नाही. फ्रिलवाल्या फ्रॉकमधे ती टुलुटुलू चालते, तेव्हा आपणच ढगांवर चालतोय, असं आईला भासतं. ती थोडी मोठी होऊन भातुकली मांडू लागते, तेव्हा तिच्या हातचा कुरमुऱ्यांचा खोटा खोटा भात खाताना पोट भरून जातं आणि ऊरही! मग लेक आरशात बघून स्वत: नटू लागते. चेहऱ्यावरच्या छोट्याशा पुळीने अस्वस्थ होते. नैसर्गिक, मानसिक, शारीरिक बदलाने आमूलाग्र बदलते. पूर्वीचं कोवळेपण, निरागसपण चेहऱ्यावरून नाहीसं होतं आणि कौमार्य चेहऱ्यावर मिरवू लागतं. तिचा वयात येण्याचा काळ म्हणजे लेकीच्या आईसाठी परीक्षा असते. तिला सावरणं, आवरणं, तिच्या प्रश्नांची समर्पक उत्तरं, तिचं बदललेलं ताळतंत्र सांभाळताना आईची दमछाक होते. पण त्याचबरोबर मुलगी मोठी होताना पाहणं हा तिच्यासाठी एक सोहळा असतो. जणू ते स्वत:च स्वत:ला वयात येताना पाहणं असतं, स्वत:चं तारुण्य पुन्हा अनुभवणं असतं, जगणं असतं! वाटतं, जणू आपल्या शरीराचा, आपल्याच मनाचा एक भाग स्वतंत्र होऊन वेगळा आकार घेतो आहे. लेक शाळेत जाते, नवं नवं शिकते, तिच्या मैत्रिणींच्या अल्लड गप्पांत आईसुद्धा लहान होते. लेक कॉलेजात जाते, तिचं विश्व आणखी विस्तारतं. कधी आई हेच अवघं विश्व असणाऱ्या, लेकीच्या विस्तारल्या विश्वात आई एक छोटासा ठिपका होऊन जाते. कधी दोघींचं पटत नाही. आईचे सल्ले लेकीला कंटाळवाणे वाटतात. पण अतोनात काळजीबरोबरच आईला असतं ते तिच्या विश्वाचं प्रचंड अप्रूप! तिच्या मैत्रिणी, तिचे मित्र... मन धास्तावतं. तरी मनाच्या एका कोपऱ्यात वाटतं, मला होती बंधनं, पण मी नाही तुला इतकी बंधनं घालणार! तुझ्यावर विश्वास आहे गं माझा! आईला आवडतात लेकीच्या महत्त्वाकांक्षा... तिचं आपल्या ध्येयाशी प्रामाणिक असणं... वाटतं, आपल्याला नाही जमलं असं प्लॅन्ड, फोकस्ड आयुष्य. पण लेकीने जमवलं हो! ऊर अभिमानाने भरून येतो. लेक मार्गाला लागते. कमावती होते. आई पुन्हा सुखावते. लेक बोहल्यावर चढते. साश्रु नयनाने लेकीला निरोप देताना कृतार्थ होते. लेक पहिल्या बाळाला जन्म देते आणि खरं तर आजी झालेली ती

पुन्हा आई होते. नातवंडाची आई! मुलगा आणि मुलगी या दोघांचीही आई असलेल्या मला एक अनुभव प्रकर्षाने वेगवेगळ्या क्षणी येतच राहतो. आई होणं ही स्त्रीजन्माची परिपूर्णता असतेच. पण त्यातूनही एका ' लेकीची आई ' होणं हे माझ्या मते एका स्त्रीला अधिक समृद्ध करतं. 'स्त्री'त्वाला अधिक प्रगल्भ करतं. लेकीचं आईपण म्हणजे स्वत:चं स्वत:लाच शोधणं असतं आणि हा न संपणारा शोध, प्रत्येक क्षणाला वेगळंच समाधान, अमाप सुख देऊन जातो. तात्पर्य, 'लेकीचं आईपण' म्हणजे एक सोहळा आहे, सोहळा!! आणि हो, 'लेकीचा बाप' होण्यातली गम्मत निव्वळ अवर्णनीयच! केवळ ' वंशाचा दिवा ' हवा या हव्यासापोटी, हे सुख, हे भाग्य अव्हेरणाऱ्यांएवढे दुर्दैवी आणि कर्मदरिद्री तेच!!

**वैशाली पेणकर**

==========================================================

**सुभाषित :**

उत्तमः क्लेशविक्षोभं क्षमः सोढुं न हीतरः।
मणिरेव महाशाणघर्षणं न तु मृत्कणः॥

**अर्थ :**

श्रेष्ठ पुरुषच (शारीरिक व मानसिक) क्लेशांचे आघात सहन करण्यास समर्थ असतो. इतरांना (क्षुद्र माणसांना) ते जमणार नाही. जसे उत्कृष्ट रत्नच मोठ्या दगडावरचे घर्षण सोसू शकते, मातीचे ढेकूळ ते सहन करू शकत नाही.

==========================================================

Find us on Facebook

Maharashtra Mandal NY is now on Facebook. Search for “Maharashtra Mandal NY” on Facebook. Please support the organization by clicking “like” button.

You will find the latest news, up-coming events, pictures and useful information on the page. The facebook link is

https://m.facebook.com/maharashtramandal.ny

**- Kini Prabhakarr**

==========================================================

## सुरेश भटांच्या रचनेतील वेगळी , मनमोकळी आणि लाघवी स्त्री।

सुरेश श्रीधर भट हे मराठीतील एक सुप्रसिद्ध कवी, त्यांनी मराठी भाषेत गझल हा काव्यप्रकार रुजवला. त्यांना 'गझल सम्राट' असे मानाने संबोधले जाते. त्यांचा जन्म महाराष्ट्रातील अमरावती येथे १५ एप्रिल १९३२ रोजी झाला. मराठी कवितेला नवीन वळण देणाऱ्या अग्रणी कवींमध्ये त्यांचे नाव घ्यावे लागते. अमरावती जिल्ह्यात ग्रामीण भागात नोकरी करताना त्यांनी त्यांचे कविता लेखन सुरू ठेवले होते. त्यांनी लिहिलेल्या कवितांचे एक चोपडे हृदयनाथ मंगेशकरांना एका फुटपाथवर सापडले. त्यातील कविता वाचून त्यांनी सुरेश भटांना शोधून काढले आणि त्यांच्या कवितांना चाली लावून त्या अमर केल्या. असे एके ठिकाणी मी वाचल्याचे आठवते. त्यांच्या गझला व कविता  लता मंगेशकर, आशा भोसले, सुरेश वाडकर आदींनी गायल्या आहेत.

***सख्या तुला भेटतील माझे***

***तुझ्या घरी सूर ओळखीचे***

***उभा तुझ्या अंगणी स्वरांचा***

***अबोल हा पारिजात आहे***

महाराष्ट्राच्या काव्य प्रदेशांमध्ये खऱ्या अर्थाने गझलेला मानाचे स्थान मिळवून देणारे कवी म्हणजे सुरेश भट होय. त्यांच्या कवितेमधील स्त्री गझल प्रमाणेच नजाकत आणि सौंदर्याने भरलेली असणार यात शंका नाही. पण 'सुन्या सुन्या मैफिलीत' सारख्या गझल मधून सुरेश भटांनी घटस्फोटिता किंवा एकाकी स्त्रिया यांचे दुःख जाहीरपणे मांडले आहे आणि त्यांच्या भावना नेमक्या शब्दांमध्ये टिपलेल्या आहेत. संगीतकार कोण? गायक कोण? आणि ज्यांच्यावर चित्रित केलेली आहे ती अभिनेत्री कोण? या सर्वांचा विचार बाजूला ठेऊन नेमकेपणाने स्त्री जातीच्या मनोभावना व्यक्त करताना सुरेश भट नेमकी ठसठसणाऱ्या वेदनेवर बोट ठेवून फिर्याद करणाऱ्या शब्दात विचारता ते सरळ अंगावर येणारे दुःख असते.

***उगीच स्वप्नांत सावल्यांची***

***कशास केलीस आजर्वे तू***

***दिलेस का प्रेम तू कुणाला***

***तुझ्याच जे अंतरात आहे।***

पुरुषाच्या मनामध्ये प्रेमाचा सागर असला तरी त्यातील किती थेंब स्त्रीच्या वाट्याला येतात, विचार करायला प्रवृत्त करतात. सुरेश भट यांच्या कवितेतील स्त्री खऱ्या अर्थाने बेडर आहे, असेही कधी कधी जाणवते. कवी आणि लेखकाची एकूण जीवन पद्धती जगण्याची भिडण्याची रीत बेडर आणि बिनधास्त तितकीच त्यांच्या कवितेमधील पात्रं सुद्धा बेडर आणि बिनधास्त असतात असे पहिल्यापासून वाटते.

***निजलेल्या गावातून आले मी एकटीच***

***दूर दिवे कळलावे पडले मागे कधीच***

***या इथल्या तरुछाया पण सारे जाणतात ।।***

आपल्या प्रियकराला भेटण्यासाठी रात्रीच्या वेळी एकटीच आलेली ही तरुणी निश्चितपणे आपल्या प्रियकराला भेटते आणि आपण एकटेच आले मोठ्या हिमतीने त्याला सांगते. दिव्यांना कळलावे म्हणणे ही एक सुंदर उपमा या ठिकाणी वाचायला मिळते, दिवा म्हणजे प्रकाश त्यापासून काय लपणार... ?? त्याच्यापासून काही लपणार नाही आणि तो सर्वांना सांगणार अशा अर्थाने ज्यांनी कुणी आपल्याला पाहिले असेल त्यांची पर्वा न करणारी ही स्त्री आहे.

***जाऊ चल परत गडे, जागले न घर अजून***

***पण माझी तुळस तिथे गेली हिरमसून***

परत निघताना अजून आपले घरचे जागे झाले नसतीलच याची तिला खात्री आहेच पण आपली अंगणातली तुळस मात्र आपल्यावर नाराज झाली असेल असे सुद्धा तिच्यातील पापभिरू स्त्रीला वाटते. एकाच वेळी बेडरपणा आणि पापभिरूपणा अश्या एकत्रित भावना सुरेश भटांच्या कवितेमधून स्त्री व्यक्त करते. सुरेश भटांनी आणीबाणीच्या काळामध्ये जी परिस्थिती होती ती आपल्या कवितेमधून मांडल्याचे लक्षात येते. 'उषःकाल होता होता' ह्या प्रसिद्ध रचनेमध्ये ते म्हणतात,

***जिथे देवकीचा पान्हा दुधाने जळाला***

***कसे पुण्य दुर्दैवी अन पाप भाग्यशाली,***

देवकीचा पान्हा दुधाने जळाला, या ओळींमधून मातृत्व कधीकधी कसे शापित ठरते, कर्तृत्ववान स्त्रीला

किती वेगळ्या स्तरांवरून संघर्ष करावा लागतो असेच जणू कवींनी वरील ओळीतून सुचवले आहे असे वाटते.

सुरेश भटांनी आपल्या कवितेमधून भारतीय समाजव्यवस्थेतील स्त्रियांची घुसमट सुद्धा शब्दांकित केली आहे

***गडे मला बोलता न आले, कुनीकुणी बोललेच नाही...***

***अखेर माझ्याच आसवाना तुझा पता मी पुसून आले !***

अव्यक्त भावना आणि लोकलाजेमुळे होणारी घुसमट ही स्त्रीच्या जीवनामध्ये कायमस्वरूपी आलेली असतेच नेमका तोच धागा पकडून त्यांनी आपल्या गझलेमधून तो भाव व्यक्त केला आहे.

***जरी ओठावर येती नभाचे शब्द स्वच्छंदी, मला बोलायची बंदी तुला ऐकायचे बंदी!***

***कसा घ्यावा तुझ्यापाशी विसावा श्रांत चंद्राने? तुझ्या डोळ्यात स्वप्नांचा उभा वाडा चिरेबंदी!!***

अशा शब्दांमधून भारतीय समाजातील स्त्रियांच्या अव्यक्त घुसमटीची कोंडी सुरेश भटांनी जाहीर करत पुरुषप्रधान संस्कृतीला काही अपरिरिहार्य प्रश्न विचारून निःशब्द केले आहे.

***जरी दारापुढे आकाश आले, तुला अद्याप चिंता अंगणाची ;***

***मला येतात भूमीतून हाका.... उठे सीता नव्या रामायणाची !***

खरे म्हणजे पारंपारिक रूढी परंपरा सोडून स्त्रियांनी जगण्याच्या नव्या संघर्षाला सामोरे गेले पाहिजे, अग्निपरीक्षा आणि वनवासात जाणारी सीता किंवा भूमीमध्ये गडप झालेली सीता जमिनीमधून पुन्हा उठून बाहेर आली पाहिजे आणि तिने ह्या पुरुषप्रधान संस्कृतीला सामोरे गेले पाहिजे आणि स्वतःचा न्याय स्वतः मिळवला पाहिजे असेच जणू कवीला सुचवायचे आहे.

***मालवून टाक दीप, चेतवून अंग अंग***

***राजसा किती दिसात, लाभला निवांत संग***

अशा प्रणयगंधित शब्दांमधून प्रियकराला सरळ सरळ आवाहन करणारी स्त्री अभिसारिका बनून सुरेश भटांच्या गझलेमधून मधून रसिकाला कधी आकर्षित करते. तर कधी,

***मलमली तारुण्य माझे, तू पहाटे पांघरावे***

***मोकळ्या केसात माझ्या, तू जीवाला गुंतवावे***

***लागुनि थंडी गुलाबी, शिरशिरी यावी अशी ही***

***राजसा माझ्यात तू अन् मी तुझ्यामाजी भिनावे***

अशा अलवार प्रणयसूचक शब्दांमधून सुरेश भट यांच्या कवितेतील स्त्री निर्मळ आणि नितळ प्रेमभावनेचा राग आळवत असते त्याच वेळी सीमेवर देशासाठी लढणाऱ्या एखाद्या वीर शहीदाचे कलेवर समोर पाहून त्याची विधवा तरुण पत्नी काय विचार करत असेल याबाबत कल्पना करून सुरेश भटांनी जी रचना केलेली आहे तिला खरोखर मराठी साहित्यातच नव्हे तर वैश्विक साहित्य सुद्धा तोड नसावी. वरवर पाहता धुंद प्रणयगीत वाटणारे हे गीत म्हणजे सुरेश भटांच्या लेखणीचे सामर्थ्य दर्शवणारे गीत आहे.

***तरुण आहे रात्र अजुनी, राजसा निजलास का रे***

***एवढयातच त्या कुशीवर, तू असा वळलास का रे***

आपल्या सख्याचे कलेवर समोर असताना तिच्या मनातील आक्रंदन नेमक्या शब्दांमध्ये मांडण्याचे काम कवीने या रचनेमध्ये केलेले आहे. याठिकाणी त्या कुशीवर वळले म्हणजे जन्ममरण अशा दोन बाजू गृहीत धरून त्या कुशीवर म्हणजे मरणाच्या  बाजूने असे तर कवीला सुचवायचे नाही ना असा प्रश्न उपस्थित होतो.

***अजूनही विझल्या न गगनी, तारकांच्या दीपमाळा***

***अजून मी विझले कुठे रे, हाय तू विझलास का रे***

मी जिवंत असताना तू निघून जाणे हे नक्कीच जास्त नाही असे म्हणून ती पुढे म्हणते

***ओठ अजुनी बंद का रे, श्वास ही मधुमंद का रे***

***बोल शेजेच्या फुलावर, तू असा रुसलास का रे।***

अनेक दिवसांपर्यंत या गीताला मी एक प्रणयगीत म्हणूनच ऐकत आलो आणि दाद देत गेलो मात्र कधीतरी एकदा या गीताचा अन्वयार्थ मृत्युमुखी पडलेल्या सैनिकाच्या विधवेच्या आलापाशी आहे असा

उल्लेख एका ठिकाणी वाचला तो वाचून मीही त्या दृष्टीने या गीताचा विचार केला आणि सुरेश भटांच्या प्रतिभाशक्तीचा वेगळाच पैलू मला गवसला. कृष्ण आणि राधा ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू या अनुषंगाने राधा या कवितेमध्ये कृष्णाच्या बरोबरीने राधेचे व्यक्तिचित्रण सुरेश भटांनी अगदी साध्या आणि सोप्या शब्दात केले आहे.

***कृष्ण देह राधा बाहू, कृष्ण राई राधा कुहू!! कृष्ण भाल राधा बिंदी, कृष्ण हात राधा मेंदी!!***

थोडक्यात कृष्णाशिवाय राधेला आणि राधे शिवाय कृष्णालाही पूर्णत्व नाही, स्त्री-पुरुष समसमान आहे असेही या कवितेमधून सुरेश भट सांगतात. माहेरवाशीण कवितेमध्ये

***मेंदीच्या पानावर मन अजून झुलते गं*** असे म्हणतानाच कधीतरी अचानक एखाद्या कडव्यात

***लदबदल्या आवळीस अजून तीच घाई गं । चिमणीच्या दातांची चव अवीट बाई गं!!***

***अजून तुझे हळदीचे अंग अंग पिवळे गं ।अजून तुझ्या डोळ्यातले मोठेपण कवळे गं!!***

अशा शब्दात माहेरपणाला आलेल्या नवतरुण यांचे मनोभाव, जुन्या नव्या आठवणी, वयानुरूप आलेला अल्लडपणा इत्यादी शब्दात मांडून सुरेश भटांनी त्या माहेरवाशिणी कायमस्वरूपी सजीव केलेल्या आहेत. मोहोर, मधुराणी अशा रचनांमधून सुद्धा जाणिवा गडद करणारे कवी भाऊबीज या कवितेमध्ये मात्र कमालीचे अस्वस्थ होतात. बहिणीची आठवण आल्यावर ते म्हणतात,

***इथे साऱ्याच बहिणी परक्या या नगरात, परी असे निराळीच माझ्या बहिणीची प्रीत***

***कसे बहिणीचे नाते कशी बहिणीची माया, ओवाळणी मागतसे सालभर भांडूनिया***

परक्या नगरात बहिणी पासून दूर असणारा कवी परक्या नगरातील सर्व स्त्रियांना बहिणी समान मानतो मात्र तरीही स्वतःच्या बहिणीची आठवण त्याला तीव्रतेने येते यातच कविता स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि स्वतःच्या बहिणी वरील प्रेम दोन्ही गोष्टी एकाच वेळी वाचकांच्या लक्षात येतात. भाऊबीज या बहिण भावाच्या सणा सोबतच संक्रात या स्त्रियांच्या महत्त्वपूर्ण सणाची सुद्धा दखल कवीने आपल्या कवितेत घेतलेली आहे. ‘आज गोकुळात रंग खेळतो हरी’, किंवा ‘आज पहाटे श्रीरंगाने मजला पुरते लुटले’ अशा कवितांमध्ये कृष्णवेड्या गोपिका आपले भाव प्रगट करत आहेत असेच कविता वाचताना वाटते.

***तसे किती काटे रुतले आमुच्या गतीला;***

***तुझा सूर केवळ होता एक सोबतीला.***

गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना उद्देशून लिहिलेली सूर ही कविता लता मंगेशकर यांचा संघर्ष अधोलिखित करणारी सुंदर अशी रचना आहे. तितक्याच ताकदीने आशा भोसले यांच्या ६० व्या जन्मदिवसानिमित्त त्यांनी केलेली रचना आशा भोसले यांचे व्यक्तिचित्रण करते,

***तारुण्य तुझ्या हृदयाचे असेच बहरत राहो, वार्धक्य तुझ्या जगण्याला असेच विसरत राहो ;***

***अमृतमय मद्याचा खळाळता अक्षय प्याला, एकेक घोट सुकलेल्या शब्दांना फुलवत राहो.***

सुरेश भटांच्या गीतांना लता मंगेशकर आणि आशा भोसले यांचे बोल लाभणे आणि आजही पूर्ण महाराष्ट्रात घराघरातून सुरेश भटांची गीते ऐकायला येणे ही सुरेश भटांची प्रतिभेची साक्ष आहे.

***एक वीज कडकडून झाशीच्या किल्ल्यावर लखलखली...***

***प्रेता सम नीजलेला भारत देश पुन्हा जागा झाला!!***

१८५७ या कवितेमध्ये झाशीची राणी लक्ष्मीबाई तिच्या बलिदानामुळे संपूर्ण देश जागृत झाला अशा शब्दांमध्ये लक्ष्मीबाईचे गुणगान आणि स्त्री गौरव कवीने केलेला आहे. 'शारदे' या कवितेमध्ये

***ही युगे जाहली कोंडली राहिली तू, नव्या सृष्टीला आजला पाहणे***

अशा ओळींमधून विद्येची देवता असली तरी ती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली नाही, एक प्रकारे तिला सुद्धा स्त्री रूपामध्ये कोंडून ठेवण्याचे काम या व्यवस्थेने केले आहे असे सुरेश भट म्हणतात. स्त्रियांना या सर्व बंधनातून मुक्त करण्यासाठी 'योगिनी' या कवितेमध्ये योगिनीला म्हणजेच घरातील स्त्रियांना स्पष्ट शब्दात ह्या सर्व रिती परंपरा सोडून मुक्तपणे जगण्याचा सलाद सुरेश भटांनी दिलेला आहे असे वाटते. ते म्हणतात,

***का भस्मावृत, जी चंदन चर्चित काया?***

***होईल कधी का व्याघ्रम्बर सुमशय्या ?***

***जखडती यौवना रुद्राक्षाच्या माला,***

***चालला चालला वसंत सखे वाया !***

अशा रीतीने मंदिरातील योगिनीला संन्यास सोडून संसार आणि त्यातील नैसर्गिकता याबाबत बोलताना शेवटी कवी सरळ

***चल सोड शिवालय; क्षितिजे खुली अनंत***

असे आवाहन करतो. सुरेश भट यांचे एकंदरच जीवन हे बिनधास्त, मनात येईल तसे जगणारे, जीवनावर प्रेम करणारे, जीवनाचा आनंद देणारे, सौंदर्यासक्त स्वभाव पिक्चर सर्व गुणांनुसार त्यांच्या कवितेतील स्त्री हीसुद्धा जीवनावर प्रेम करणारी, प्रेमाला सर्वस्व मानणारी, पापभिरू असली तरीही तीतकीच बेडर आणि बिनधास्त आहे.  सुरेश भटांच्या

***रंगात साऱ्या रंगुनिया रंग माझा वेगळा***

***गुंत्यात साऱ्या गुंतूनिया पाय माझा मोकळा।***

या ओळीप्रमाणे त्यांच्या कवितेतील स्त्री सुद्धा पूर्णपणे आगळीवेगळी आणि सर्व बंधनातून मोकळी स्वच्छंद जीवन जगणारी आहे हे निश्चितपणे मान्य करावे लागते.

**किरण शिवहर डोंगरदिवे**

==========================================================

PNG JEWELERS
PARAMPARA ACHCHAI KI
SINCE 1832

Maharashtra Mandal, New York is sponsored by PNG Jewellers

==========================================================

## थेंब भिजका क्षण

भलत्याच वेळी कधीतरी तुझी ओलसर आठवण येते,

लाख विसरायचं म्हणतो पण ती पावसात हटकुन येते.

अगं म्हणे तू त्या चंद्राकडेही बघत नसतेस आजकाल,

चांदण्यांनीच सांगितले पाहून तुझे अश्रू भिजले रुमाल,

तसे मीही विसरण्याचे येथे धुंडत असतो लाख बहाणे,

पण आवर्जून आठवते बघ पावसाचे ओलेचिंब गाणे.

नाही म्हंटलं तरी थोडा वारा चिमटीत धरून ठेवलाय,

तुझ्या श्वासाच्या सुगंधा एवढा पाऊस जपून ठेवलाय.

बरं सांग पाऊस अनावर होऊन पडतो की ढग रडतो,

थेंब भिजला क्षण कोणत्या हळवेपणाने पानातून झरतो.

जाऊ दे काही गोष्टी चिंब भिजूनही मी सांगणार नाही,

कोरड्या मनाने तुही ते सारं पुन्हा नव्याने ऐकणार नाही.

झालेच तर एखादेवेळी कधी एकांताचे डोळे पुसून बघ...

अंगावर पाऊस येण्या आधीचा मंद गारवा झेलून बघ.....

खरंच असं सर्व शब्दात म्हणून सांगता येत नसतं बाई

तुला म्हणून सांगतो ढगात पाणी उगाच साचत नाही.

तशी तू आताशा चिंब पावसात भिजत नाहीस हे खरं का ?

पण माझ्या डोळ्यात आठवणीचं आभाळ दाटतंय बरं का ?

**किरण शिवहर डोंगरदिवे**

## निरोपपर गीत....

निरोप घेता ओल्या नयनी,
दवबिंदूसम अश्रू ढळला ।

पुन्हा न केव्हा गाठीभेटी,
ही सारी दैवाची किमया ॥

नाते न उरले दोन जीवांचे,
विलग झाल्या जीवन सरिता ।

असशील तिथे तू सुखी राहा,
हेच मागणे त्या परमेशा ॥

**वैशाली पेणकर**

# Corn Curry



**Ingredients:-**

2 cups corn
1 onion finely chopped (reserve some for grinding)
1 tomato finely chopped
I tbsp ginger-garlic paste
1 tsp red chili powder
1 tsp turmeric powder
1 tsp coriander seeds
1 tsp cumin seeds
1/4 cup coconut scrapped
1/4 cup peanuts
1 tbsp oil
Salt to taste
Coriander leaves for garnishing

**Procedure:-**

1. In a pan heat the oil, once hot add halt of the cumin seeds, once they crackle add the onions & fry them till golden brown.
2. Then add little of the ginger-garlic paste. Add the tomatoes & cook for a few minutes. In a separate pan roast the coconut, peanuts, coriander leaves, remaining ginger-garlic, remaining cumin seeds, onion till brown in color & grind them in a blender.
3. Then put it in the pan. Then add the corns with 1/2 cup water & cook the curry till done.
4. Garnish it with coriander leaves.

**- प्रीती बाणावलीकर**

www.pritiskitchen.weebly.com

## स्नेहदीप जानेवारी २०२० शब्दकोड्याचे उत्तर ('नाताळ' या सूत्राभोवती गुंफलेले)

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. ने | | २. ब्लि | स | | | ३. मे | री | | ४. ला | भ | | | ५. ढ | | ६. लॉ |
| टि | | ट्झ | | ७. कॅ | रॉ | ल | | ८. मे | ख | | ९. कॉ | लिं | ग | ब | ई |
| १०. व्हि | क्स | न | | | | ११. क्यु | पि | ड | | १२. रा | मे | | | | |
| टी | | | १३. फा | १४. ई | १५. फ | र | | | १६. स्नो | | १७. ट | र्ट | १८. ल | १९. डो | व्ह |
| | २०. उ | | २१. द | हा | वा | | २२. सा | २३. धू | | २४. फॉ | | | २५. व | न | |
| २६. बा | ल्था | २७. झा | र | | रा | | | २८. प | २९. रा | ग | | ३०. ऊ | श | र | |
| य | | ड | | ३१. स्ले | | ३२. प्रॅ | ३३. ट | | जे | | ३४. त | म | | | ३५. जिं |
| ३६. ब | ३७. स | | | | ३८. डा | न्स | र | | | ३९. सु | ज्ञ | | | ४०. बि | ग |
| ४१. ल | हा | न | | ४२. हो | का | र | | ४३. कॅ | | ख | | | ४४. ए | न्ज | ल |
| | ण | | ४५. फ्रे | म | | | | ४६. स्प | र्धा | | ४७. रु | डॉ | ल्फ | | |
| ४८. हो | | ४९. इ | न्च | | | ५०. सां | ५१. बा | र | | ५२. सो | पे | | | ५३. गो | ष्ट |
| | ५४. बे | थ्ल | हे | ५५. म | | ५६. ता | रा | | ५७. सो | ने | री | ५८. अं | ग | ठ्या | |
| ५९. ले | डी | | ६०. न | ग | | क्लॉ | | ६१. हं | स | | | त | | ६२. त | ६३. प |
| क | | | | | ६४. गी | ज | | ६५. ब | क | | ६६. ती | | ६७. पे | | द |
| | ६८. ये | ६९. शू | | | | | ७०. बा | ग | | ७१. रे | न | ७२. डि | अ | ७३. र | |
| ७४. शां | त | रा | त्र | | ७५. ड्र | म | र | | ७६. स्क्रू | ज | | ७७. श | र | म | |

– विनायक दामले

## स्नेहदीप एप्रिल २०२० शब्दकोडे



**आडवे शब्द :**

१. पूर्व दिशा
२. अनपेक्षित
५. तोंडावळा
६. नाश, दुर्दशा
९. विष्णूच्या दहा अवतारांतील एक
१०. बागकाम करणारा
११. खोड, दुर्गुण, वाईट सवय
१२. साप
१४. दहा वर्षे
१५. एक मोठी संख्या किंवा झाडापासून मिळणारा एक उपयोगी पदार्थ
१७. विज्ञान किंवा विषय
१८. मुंज
२१. मग्न
२२. नमस्कार

**उभे शब्द :**

१. जीव
२. वृत्तांत
३. आगळी-वेगळी गोष्ट करून दाखविणे
४. पध्दत
७. उचित, चोख
८. ताट
१०. शिवाजी महाराजांचे सहकारी, सैनिक
१२. आयुधांसकट
१३. आक्रोश
१४. रावण
१६. खणणे
१८. तापट, भडक, भयंकर, दुःसह
१९. मृत्यूचा देव
२०. गांधीजींनी या प्रकारच्या कापडाचा पुरस्कार केला

**(शब्दकोड्याचे उत्तर १५ जून २०२० पर्यंत info.mmny.online@gmail.com या ई-मेल पत्त्यावर पाठवावे. अचूक उत्तर पाठविणाऱ्यांची नावे पुढील अंकात प्रसिध्द करण्यात येतील.)** **- नीता नाबर**

# स्नेहदीप जानेवारी २०२० कोड्याचे उत्तर




१) नटरंग
२) दुनियादारी
३) टाईमपास
४) डॉ. प्रकाश बाबा आमटे
५) सातच्या आत घरात
६) धूमधडाका
७) चौकट राजा
८) एक डाव भुताचा

(कोडं व उत्तर जालावरून साभार)

# स्नेहदीप एप्रिल २०२० कोडे

खालील अक्षरांत काही सुप्रसिद्ध मराठी लेखक किंवा कवींची नावे दडलेली आहेत ती ओळखा

१. वी य त ळ वं ज द
२. आ ह ना य टे री ण प रा
३. के अ द श प्र द त्रे ल्हा
४. बा नी रो र स ब जि
५. ट सं प त बा व
६. भा र्गा त ग दु व
७. भें ष सु डे भा
८. म ल्ली ती प रु चि मा त
९. ई ण त दे जि सा र
१०. पां ल दे डे पु श
११. रे अ णा ढे रु
१२. वा ए श कुं र ज म ल हे
१३. गी र ळ गं ड ध गा गा
१४. क णे री म ग ग रा ड श
१५. बो ग गो मं ले ड ला
१६. ध ख र गो द्या ले वि
१७. चिं ण ना शी वि ता जो य म क
१८. द बा म बा क
१९. रू त सं पु ळे षो व का त म
२०. णे त का अ र नं क
२१. क ष णे री क शि र
२२. का ट त र सं ने व क
२३. क गे धू र्णि मं श म क
२४. ती र्वे रा इ क व
२५. की जा री र गि

प्रेषक - विनायक दामले

**(कोड्याचे उत्तर १५ जून २०२० पर्यंत info.mmny.online@gmail.com या ई-मेल पत्त्यावर पाठवावे. अचूक उत्तर पाठविणाऱ्यांची नावे पुढील अंकात प्रसिध्द करण्यात येतील.)**

==================================================

## जोडीदार (वधूवरसूचक सदर)



(चित्र - MS Word ClipArt)

नमस्कार मंडळी, जानेवारी २०१४ पासून आम्ही स्नेहदीपमधे 'जोडीदार' हे नवीन सदर केले आहे. त्यात तुम्ही विवाहविषयक जाहिराती देऊ शकता. वधूची/वराची माहिती, वराबद्दल/वधूबद्दल अपेक्षा मराठी/हिंदी किंवा इंग्रजीतून info.mmny.online@gmail.com या ई-मेल पत्त्यावर पाठवावे. शब्दमर्यादा : २०० शब्द. **जाहिरातीत तुमची संपर्कविषयक माहिती (फोन/ई-मेल, इ.) द्यावी.** ई-मेल पत्त्यातून तुमचे नाव लोकांना कळू द्यायचे नसल्यास abc_123@yahoo.com अशा प्रकारचा, नाव जाहीर न करणारा, ई-मेल account सुरू करून वापरावा. **ज्यांना या जाहिरातींना प्रतिसाद द्यायचा असेल त्यांनी थेट जाहिरातदारांशीच संपर्क साधावा.** स्नेहदीप मध्यस्थी करू शकणार नाही. जाहिरातीतील वधू-वरांच्या माहितीबद्दल, तसेच जाहिरातींना प्रतिसाद देणाऱ्या लोकांबद्दल स्नेहदीप संपादक मंडळ किंवा महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क जबाबदार असणार नाही. स्नेहदीपच्या या सेवेतून नवीन स्नेहबंधने जुळून येतील अशी आशा करूया !

==================================================

(या अंकातील काही चित्रे जालावरून साभार घेतली आहेत. ज्या चित्रांचा मूळ मालकी हक्क माहीत असेल तो त्या त्या चित्राखाली निर्देशित केला आहे. इतर चित्रांच्या बाबतीत कॉपीराईट हक्कभंग होत असेल किंवा कोणाला काही आक्षेप असेल, तर आमच्याशी info.mmny.online@gmail.com या ई-मेल पत्त्यावर संपर्क साधावा. आम्ही योग्य त्या मालकाच्या इच्छेप्रमाणे, त्या चित्राखाली त्यांचा ऋणनिर्देश करू किंवा ते चित्र काढून टाकू. MMNY किंवा 'स्नेहदीप' इतरांच्या चित्रांबद्दल श्रेय घेत नाही किंवा इतरांची चित्रे आर्थिक फायद्याकरता वापरत नाही. MMNY ही नॉनप्रॉफिट संस्था आहे व 'स्नेहदीप' हे मोफत ई-त्रैमासिक आहे.)

(Some pictures in this magazine are borrowed from web. When the source of a picture is known, we mention it under that picture. For other pictures from unknown sources, if anyone has any objection/copyright problem, please contact us at **info.mmny.online@gmail.com** We will mention the appropriate source name or remove the picture as per the owner's wish. MMNY or Snehadeep do not take credit for borrowed pictures nor do they use those pictures for financial gain. MMNY is a nonprofit organization and Snehadeep is a free e-magazine.)

==================================================

==========================================================

## १ एप्रिल २०२० ते ३१ ऑगस्ट २०२० मधील काही महत्त्वाचे दिवस (कालनिर्णय भारतीय आवृत्तीप्रमाणे)

श्रीराम नवमी : २ एप्रिल २०२०
महावीर जयंती : ६ एप्रिल २०२०
हनुमान जयंती : ८ एप्रिल २०२०
गुड फ्रायडे : १० एप्रिल २०२०
संकष्टी चतुर्थी : ११ एप्रिल २०२०
ईस्टर : १२ एप्रिल २०२०
डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती : १४ एप्रिल २०२०
अक्षय्य तृतीया : २६ एप्रिल २०२०
महाराष्ट्र दिन, आंतरराष्ट्रीय कामगार दिन : १ मे २०२०
बुध्दपौर्णिमा : ७ मे २०२०
संकष्टी चतुर्थी, मदर्स डे : १० मे २०२०
रमजान ईद : २५ मे २०२०
वटपौर्णिमा : ५ जून २०२०
संकष्टी चतुर्थी : ८ जून २०२०
फादर्स डे : २१ जून २०२०
देवशयनी आषाढी एकादशी : १ जुलै २०२०
अमेरिकन स्वातंत्र्यदिन : ४ जुलै २०२०
गुरुपौर्णिमा : ५ जुलै २०२०
संकष्टी चतुर्थी : ८ जुलै २०२०
लोकमान्य टिळक जयंती : २३ जुलै २०२०
नागपंचमी - २५ जुलै २०२०
लोकमान्य टिळक पुण्यतिथी, बकरी ईद - १ ऑगस्ट २०२०
नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन - ३ ऑगस्ट २०२०
संकष्ट चतुर्थी - ७ ऑगस्ट २०२०
श्रीकृष्ण जयंती - ११ ऑगस्ट २०२०
गोपाळकाला - १२ ऑगस्ट २०२०
भारतीय स्वातंत्र्यदिन, पतेती - १५ ऑगस्ट २०२०

पारशी नूतनवर्ष - १६ ऑगस्ट २०२०

पोळा, मातृदिन - १८ ऑगस्ट २०२०

हरितालिका तृतीया - २१ ऑगस्ट २०२०

श्रीगणेश चतुर्थी - २२ ऑगस्ट २०२०

ऋषीपंचमी - २३ ऑगस्ट २०२०

==========================================================

**सर्व आगामी सण-उत्सवांसाठी हार्दिक शुभेच्छा!**

स्नेहदीप संपादक मंडळ व महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क

==========================================================